# बालसाहित्य पुरस्कारांचे आज दिल्लीत वितरण

**म. टा. विशेष प्रतिनिधी, नवी दिल्ली**

साहित्य अकादमीतर्फे दिल्या जाणाऱ्या प्रतिष्ठित बालसाहित्य पुरस्कार २०२३चे वितरण आज, गुरुवारी दिल्लीत होणार आहे. सायंकाळी ५ वाजता मंडी हाऊस भागातील त्रिवेणी सभागृहात २१ भाषांमधील बालसाहित्यिकांना हे पुरस्कार प्रदान केले जातील. यंदाच्या विजेत्यांमध्ये विख्यात लेखिका व सामाजिक कार्यकर्त्या सुधा मूर्ती (इंग्रजी) यांच्यासह एकनाथ आव्हाड (मराठी) व तुकाराम रामा शेट (कोकणी) यांचा समावेश आहे.

साहित्य अकादमीचे अध्यक्ष माधव कौशिक यांच्या हस्ते हे पुरस्कार प्रदान करण्यात येणार असून या सोहळ्याचे प्रमुख पाहुणे प्रख्यात इंग्रजी लेखक आणि अभ्यासक हरीश त्रिवेदी असतील. अकादमीच्या उपाध्यक्ष कुमुद शर्मा, सचिव के श्रीनिवास राव यांची प्रमुख उपस्थिती असेल. दरम्यान, पुरस्कार वितरण कार्यक्रमाच्या दुसऱ्या दिवशी शुक्रवारी साहित्य अकादमीच्या सभागृहात पुरस्कार विजेत्या बाललेखकांसह 'लेखन संमेलन' आयोजित करण्यात आले आहे. यावेळी यंदाचे पुरस्कार विजेते आपापले लेखनाचे अनुभव सांगतील.

**बालसाहित्य पुरस्काराचे विजेते**

रथींद्रनाथ गोस्वामी (आसामी), श्यामलकांती दाश (बंगाली), प्रतिमा नंदी नरजारी (बोडो), बलवान सिंह जामोदिया (डोगरी), रक्षाबेहेन पी. दवे (गौजा), सूर्यनाथ सिंग (हिंदी), विजयश्री हलादी (कन्नड), , अक्षय आनंद 'सनी' (मैथिली), प्रिया ए.एस. (मल्याळम), दिलीप ननमथम (मणिपुरी), मधुसूदन बिश्त (नेपाळी), जुगल किशोर शाडांगी (ओडिया), गुरमीत काडियालवी (पंजाबी), किरण बादल (राजस्थानी), राधावल्लभ त्रिपाठी (संस्कृत), मानसिंग मली (संथाली), ढोलन राही (सिंधी), के. उदयशंकर (तमिळ), डी. के. चदुवूल बाबू (तेलुगु) आणि कै. मतीन अचलपुरी (उर्दू)